संत गाडगे बाबा अमरावती अमरावती विद्यापीठ अंतर्गत

# राष्ट्रीय सेवा योजना

# श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला

विशेष शिबीर – ग्राम आपोती (खुर्द)

## अहवाल

## दि. १६ / १२ / २०१८ ते २३ / १२ / २०१८

**दिनांक : १६/१२/२०१८**

**वार : रविवार**

### आगमन, पूर्वतयारी, स्वच्छता व नोंदणी

ग्राम आपोती (खु.) येथे दिनांक १६/१२/२०१८ रोजी विद्यार्थ्यांचे आगमन झाले, यानंतर विद्यार्थ्यांची नोंदणी व पूर्वतयारी करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रम परिसर कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर विद्यालय येथे स्वच्छता करण्यात आली. तसेच गावकऱ्यांसोबत चर्चा व प्रकल्पांची पाहणी करण्यात आली."स्वच्छ भारत स्वस्थ भारत"अभियान अंतर्गत ग्राम आपोती (खु.) येथे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची व कार्यक्रमाची माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांनी गावकऱ्यांना दिली.

**दिनांक : १७/१२/२०१८**

**वार : सोमवार**

### उद्घाटन समारोह

ग्राम आपोती (खु.) येथे श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन १७ डिसेंबर २०१८ रोजी पार पडले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून मा. डॉ.आर.बी. हेडा (दंतशल्य चिकित्सक तथा अध्यक्ष दि.बी.जी.ई. सोसायटी, अकोला) हे उपस्थित होते व उद्घाटक म्हणून क.शि.प्र.संस्था आपातापा चे अध्यक्ष श्री दामोधर कडू उपस्थित होते.

मा.ॲड. श्री.मोतीसिंहजी मोहता (मानद सचिव दि.बी.जी. ई. सोसायटी, अकोला)व मा.डॉ.व्ही.डी. नानोटी (प्राचार्य श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय,अकोला हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाचे उद्घाटनास लाभले होते. कार्यक्रमाची शोभा वाढविण्यास इतर मान्यवर सुद्धा उपस्थित होते. सौ.लक्ष्मीताई संजय घुसे (सरपंच),डॉ.उमेशराव वि. बोपटे (उपसरपंच),श्री.कैलासराव वि. अपोतीकर (पोलीस पाटील), डॉ. शांतारामजी बुटे (संस्थापक क.शि.प्र.संस्था आपातापा) हे सुद्धा उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण व पूजन करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.डी.नानोटी यांनी केले. मा.ॲड.श्री.मोतीसिंहजी मोहता यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.मा.डॉ.आर.बी.हेडा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रासेयोच्या शिबिराची स्तुती करत मोठ्या प्रमाणात मुलींची संख्या असल्यामुळे अभिनंदन केले.त्यांनी मागील ६-७ वर्षांत त्यांना आलेला रासेयो शिबिराचा अनुभव सांगितला.रासेयो शिबिराद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व विद्यार्थी खऱ्या अर्थाने घडतो असे सांगितले. विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी कार्य करून आपल्या व्यक्तिमत्त्वात भर टाकावा असे सांगितले. शिबिरार्थी स्वयंसेवकांना शिबिर आनंदी व यशस्वी होवो अशा शुभेच्छा दिल्या. गावच्या सरपंच सौ.लक्ष्मीताई घुसे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे गावातर्फे स्वागत केले. तसेच

उपस्थित पोलीस पाटील श्री. कैलासराव आपोतीकर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी सावलकर

तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांनी केले.या कार्यक्रमाला यशस्वी बनविण्याकरिता सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल व प्रा.सोनाली गवांदे, विद्यार्थी गटप्रमुख गोविंद आंधळे, यशश्री डाबेराव तसेच महेश जंजाळ,निखिल मानकर,नरेंद्र जलमकर,अखिलेश पुराणिक, प्रसाद गुल्हाने,गौरव भटकर व सर्व स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

**कार्यक्रम : संस्कारमय आध्यात्मिक ज्ञान**

**सादरकर्ते : आचार्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वरजी महाराज तायडे**

श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या पहिल्या दिवसाच्या संध्याकाळच्या सत्रात ७ .०० वा आचार्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वरजी महाराज तायडे यांचे "संस्कारमय आध्यात्मिक ज्ञान" या विषयावर उद्बोधन शिबिरार्थींना लाभले होते. या कार्यक्रमात गावातील मंडळी आणि रासेयो शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन गटप्रमुख गोविंद आंधळे यांनी केले तर आभार प्रदर्शन नरेंद्र जळमकर यांनी केले.

**दिनांक : १८/१२/२०१८**

**वार : मंगळवार**

तिसऱ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, स्फुर्तीगीते व रॅलीचे आयोजन करण्यात आले आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील नाल्यावर जागा पाहून वनराई बंधारा बांधण्याचे कामाला सुरूवात करण्यात आली.

**विषय : आपत्ती व्यवस्थापन**

**सादरकर्ते : आपत्ती व्यवस्थापन कक्ष**

**(श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला )**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे आठ दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक व रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी आपल्या प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत प्रात्यक्षिके दाखवत आपत्तीला न डगमगता कशा प्रकारे सामोरे जाता येऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रथमतः डॉ.कोहचाळे यांनी आपत्तीची खरी ओळख करून दिली आपत्तीचे प्रकार काय आणि कसे असतात हे स्पष्ट करून त्यावर प्रकाश टाकला. यानंतर प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत दोराच्या साहयाने आपण आपत्तीच्या काळात कशा प्रकारे वापर करून विविध गाठांचा उपयोग होतो, त्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अपघात झाला असेल तर पीडित व्यक्तीला कशाप्रकारे प्रथमोपचार द्यावा याचे प्रात्यक्षिक दिले. त्यानंतर पुनर्जिवितीकरण कशाप्रकारे करण्यात येते हे प्रात्यक्षिकांच्या

स्वरुवात त्यांनी रासेयोच्या शिबिरार्थींना दाखविले. तसेच प्रशिक्षित स्वयंसेवक श्री.अक्षय घोपे यांनी सर्पदंश झाल्यास कशाप्रकारे सामोरे जावे याबाबतीत मार्गदर्शन केले. सर्व आपत्या सांगून येत नाहीत आणि आपण जर आपत्यांनाच समजून घेतले आणि त्याची माहिती पूर्ण स्वरूपात ठेवली तर सर्व समाज जीवित आणि वित्तहानी पासून वाचू शकतो. "Know Disaster No Disaster"

**विषय : AIDS समज आणि गैरसमज**

**वक्ते : प्रा. डॉ. हरिश मालपाणी**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा आजचा तिसरा दिवस. आजच्या दुपारच्या बौद्धिक सत्रात श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. डॉ. हरीश मालपाणी (सूक्ष्मजीवशास्त्र विभाग)"AIDS समज व गैरसमज" या विषयावर उद्बोधन करण्यासाठी शिबिरार्थींना लाभले होते.

AIDS बद्दल समाजात असलेले गैरसमज व अज्ञान याविषयी बोलत असताना त्यांनी AIDS चे संक्रमण कशाप्रकारे होते व ते होऊ नये म्हणून कोणती खबरदारी घ्यावी याची माहिती दिली. AIDS झालेल्या व्यक्तींसोबत हस्तांदोलन केल्याने तसेच त्यांचे वस्त्र वापरल्याने AIDS चे संक्रमण होत नाही अशी महत्त्वाची माहिती त्यांनी दिली. तसेच या विषयावरील विद्यार्थ्यांच्या शंका आणि प्रश्नांना डॉ. मालपाणी यांनी विस्तृत उत्तरे देत त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमाचे संचलन कु. प्रगती नवलकार हिने तर आभार प्रदर्शन कु. नम्रता गायकवाड या विद्यार्थिनींनी केले.

**विषय : आपले विश्व**

**उद्बोधक : प्रा. शैलेश जयस्वाल**

"आपले विश्व" या विषयावर उद्बोधन करण्याकरिता श्री.रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.शैलेश जयस्वाल (भौतिकशास्त्र विभाग) हे आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आपले विश्व,ब्रह्मंड,आकाशगंगा याविषयी माहिती दिली. तसेच ग्रह-तारे व नक्षत्रां विषयी माहितीसुद्धा त्यांनी शिबिरार्थींना दिली. कार्यक्रमाचे संचलन गोविंद आंधळे तर आभार प्रदर्शन कु.यशश्री डाबेराव या विद्यार्थ्यांनी केले

**कार्यक्रम : वैज्ञानिक दृष्टीकोन व जादुटोणा विरोधीकायदा**

**सादरकर्ते : डॉ.स्वप्ना लांडे (सामाजिक कार्यकर्त्या)**

आजच्या सायंकाळच्या सत्रात "वैज्ञानिक दृष्टीकोन व जादूटोणा विरोधी कायदा" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.स्वप्ना लांडे यांचे मार्गदर्शन मिळाले. हा कार्यक्रम विशेषत्वाने ग्रामस्थांसाठी आयोजित करण्यात आला होता, म्हणून हा कार्यक्रम आपोती (खु.) येथील हनुमान मंदिरा समोरील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता.

श्रद्धेतूनच अंधश्रद्धेचा जन्म कशा प्रकारे होतो हे त्यांनी सविस्तरपणे विविध दाखले देऊन सांगितले. तसेच ढोंगी बाबांपासून सावध राहण्याचा सल्ला सुद्धा त्यांनी दिला. विविध प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच जादूटोणाविरोधी कायद्यातील तरतुदींच्या व

शिक्षेविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाला ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचलन महेश जंजाळ तर आभार प्रदर्शन गोविंद आंधळे या विद्यार्थ्यांनी केले.

**दिनांक : १९ /१२/२०१८**

**वार : बुधवार**

चोथ्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना , स्फुर्तीगीते त्याचबरोबर प्राणायामाचे धडे मा.संजय हेडाऊ सर यांनी दिले व स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले आणि त्याचबरोबर गावातील नाल्यावर जाऊन वनराई बंधाराचे श्रमदान करण्यात आले.

**कार्यक्रम : उन्नत भारत अभियानांतर्गत शेतीपूरक मस्त्यव्यवसाय कार्यशाळा**

दुपारच्या सत्रात युवावर्गासाठी आणि गावातील गावकरीसाठी उन्नत भारत अभियानांतर्गत शेतीपूरक मस्त्यव्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे समनव्यक डॉ अर्चना सावरकर यांनी प्रथमतः कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यशाळेमध्ये प्रथम सत्रात श्री सुरेश आर.भारती (सहा. आयुक्त मस्त्यव्यवसाय) यांनी मस्त्यव्यवसाय शेतीपूरक जोड धंदा व रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रा.रंजना धर्माळे यांनी माशाची ओळख व निगा तसेच शेत तळ्यातील मस्त्यव्यवसाय बाबत मार्गदर्शन केले आणि त्याचबरोबर श्री दिनेश घोपे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली आणि अक्यरिअम बांधणी कशी करायची याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यशाळेचे समनव्यक डॉ अर्चना सावरकर यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यशाळेच्या विविध सत्राचे संचालन डॉ.सुधीर कोहचाळे यांनी तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ रश्मी जोशी व डॉ समाधान मुंडे यांनी केले.

**विषय : ताण-तणाव मुक्तीचेव्यवस्थापन**

**मार्गदर्शक : मा.डॉ. महेश डाबरे**

"ताण-तणाव मुक्तीचे व्यवस्थापन" या विषयावर मार्गदर्शनासाठी श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा.डॉ. महेश डाबरे हे आले होते. आजच्या स्पर्धेच्या युगात आणि धकाधकीच्या जीवनात अबालवृद्धांना कशाप्रकारे मानसिक दडपण येते.तसेच आजच्या स्थितीत विशेष करून तरुण कसा नैराश्याच्या गर्तेत लोटला जात आहे,याची कारणे सांगत त्यावर उपाययोजना सांगितल्या.मनाने आनंदी विचाराने समृद्ध आयुष्य कशा प्रकारे जगता येईल याविषयीसुद्धा डॉ.महेश डाबरे यांनी उद्बोधन केले.कार्यक्रमाचे संचलन कु. आरती कडू व आभार प्रदर्शन कु.आरती कतोरे या विद्यार्थिनींनी केले.

**दिनांक : २०/१२/२०१८**

**वार : गुरुवार**

पाचव्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना , स्फुर्तीगीते त्याचबरोबर प्राणायामाचे धडे , वेगवेगळे योगासने मा.संजय हेडाऊ सर आणि सौ विभा पाटील यांनी करून दाखवले आणि

शिबिराथीनी सुद्धा केले व स्वच्छता  रॅली व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असे गावातील लोकांना रॅलीच्या दरम्यान सांगण्यात आले आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील नाल्यावर जाग्यावर जाऊन वनराई बंधाराचे  ६० टक्के पर्यंत काम करण्यात आले.

**कार्यक्रम : महिला मेळावा**
**सौजन्य : Women Cell (श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय अकोला)**
**संयोजक : डॉ रश्मी सावलकर, प्रा. सोनाली गवांदे**

दुपारच्या सत्रात गावातील महिलांसाठी "महिला  मेळाव्याचे" आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ रश्मी जोशी (सावलकर) यांनी  गावातील महिलांना करून दिला. या कार्यशाळेमध्ये सुंदर माझे आंगण हि रांगोळी स्पर्था घेण्यात आली आणि गावातील महिलाना दैनंदिन जीवनामध्ये  स्वतःच्या प्रकृतीची काळजी कशी घेतली पाहिजे या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच लघु उद्दोग कार्यक्रमांतर्गत पेपर बॅग्स बनवणे यावर कार्यशाळा घेण्यात आली. या महिला मेळाव्याचे अध्यक्ष प्रा.सुजाता ताडम मॅडम तर उदघाटक म्हणून गावातील सरपंच सौ लक्ष्मीताई घुसे उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे गावातील महिला तसेच  श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मध्ये डॉ अर्चना सावरकर , डॉ पूनम अग्रवाल , श्रीमती वैशाली बडगुजर , डॉ कविता हेड डॉ अंजली सांगोले आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व मुली उपस्थित होत्या. कार्यशाळेच्या विविध सत्राचे संचालन  रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली गवांदे यांनी तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ रश्मी जोशी यांनी केले

**कार्यक्रम : व्यसनमुक्ती आंदोलन (आओ गढे संस्कारमयपिढी )**
**मार्गदर्शक : डॉ.अजय उपाध्याय(गायत्री परिवार अकोला)**

दुपारी ३:०० वाजता घेण्यात आलेल्या व्यसनमुक्ती आंदोलन या कार्यक्रमासाठी डॉ. अजय उपाध्याय हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते.तरुण वयातच या व्यसनांना आपण कसे बळी पडतो व त्यानंतर व्यसनाधीन होतो,हे अगदी सविस्तर समजावून सांगितले व अंमली पदार्थांचे कशा प्रकारे व्यसन लागते ते शास्त्रीय पद्धतीने समजावून सांगितले. व्यसनामुळे होणारी शरीराची हानी कशी न भरून काढण्यासारखी असते हे सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे शिबिरार्थींना आवाहन केले.तसेच व्यसन लागले असेल तर त्यापासून कशी सुटका करता येते याविषयी मार्गदर्शन केले व काही क्रांती गीते सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन महेश जंजाळ तर आभार प्रदर्शन कु. प्रगती नवलकार या विद्यार्थ्यांनी केले.

**विषय : डॉलर विरुद्ध रुपया (तुंबड युद्ध)**
**वक्ते : श्री.विजय एल.रुईवाले**

आजघडीला भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठे आणि महत्वाचे आव्हान म्हणजे रुपयाचे अवमूल्यन किंवा घसरण. हाच मुद्दा धरून डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण का होते व घसरण झाल्यामुळे अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतात,याबद्दल श्री.रुईवाले यांनी सखोल मार्गदर्शन केले.तसेच या विषयावरील विद्यार्थ्यांच्या शंका आणि प्रश्नांना श्री.रुईवाले यांनी विस्तृत

उत्तरे देत त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले.कार्यक्रमाचे संचलन महेश जंजाळ व आभार प्रदर्शन कु. प्रगती नवलकार या विद्यार्थ्यांनी केले.

**दिनांक : २१/१२/२०१८**

**वार : शुक्रवार**

सहाव्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, प्राणायाम , वेगवेगळे योगासने मा.संजय हेडाऊ सर आणि सौ विभा पाटील यांनी करून दाखवले आणि शिबिराथीनी सुद्धा केले आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील नाल्यावर जाग्यावर जाऊन ८० टक्के पर्यंत वनराई बंधाराचे काम पूर्ण करण्यात आले.

**कार्यक्रम : विद्यार्थी सुरक्षा आणि सायबर क्राइम**

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी "विद्यार्थी सुरक्षा आणि सुरक्षात्मक उपाय योजना " विषयावर मा. श्री.गोपाळ मुकुंदे (पो.का.दामिनी पथक अकोला पोलीस) यांचे मार्गदर्शन केले आणि त्याचप्रमाणे मा. श्री.विशाल मोरे (पो.का.दामिनी पथक अकोला पोलीस) यांनी "सायबर क्राइम आणि विद्यार्थी" या विषयावर विद्यार्थाना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ समाधान मुंडे (रासेयो कार्यक्रम अधिकारी) यांनी करून दिला. संचालन आखलेश पुराणिक यांनी तर आभार प्रदर्शन महेश जंजाळ यांनी केले

**विषय : कायदेविषयक मार्गदर्शनकार्यक्रमाचे**

**अध्यक्ष : मा.ॲड.श्री.मोतीसिंहजीमोहता** (सदस्य महाराष्ट्र-गोवा बारअसोसिएशन तथा मानद सचिव,दि.बी.जी.ई.सोसायटी अकोला)

**सौजन्य : जिल्हा विधी सेवाप्राधिकरण,अकोला.**

सायंकाळच्या सत्रात "कायदेविषयक मार्गदर्शन" ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव मा. ॲड. मोतीसिंहजी मोहता तर मार्गदर्शक म्हणून न्यायाधीश मा.अमित कोकरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण प्रभारी सचिव न्यायाधीश मा. डी. एस. दाभाडे, मा. के. पी. डवणे व मा. जे. व्ही. मस्के, मा. दामोदर कडू, मा. अनिल तापडिया, प्राचार्य मा. डॉ. विजय नानोटी, उपसरपंच मा. उमेश बोपटे, पोलीस पाटील मा. कैलासराव अपोतीकर आदी उपस्थित होते.

यामध्ये न्यायाधीश मा.अमित कोकरे यांनी राष्ट्रीय लोक अदालत तर मा. डी.एस. दाभाडे यांनी अँटी रॅगिंग कायदा त्याचप्रमाणे मा. के.पी.डवणे यांनी न्यायव्यवस्था व श्रीमती जे.व्ही.मस्के यांनी मूलभूत अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले.तसेच न्यायपालिका विधायिका आणि कार्यपालिका यांच्यात कशाप्रकारे समन्वय असते यावर सुद्धा उद्बोधकांनी प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो सह.कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जयस्वाल तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे यांनी केले.

**दिनांक : २२/१२/२०१८**

**वार : शनीवार**

सातव्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, प्राणायाम , वेगवेगळे योगासने सौ विभा पाटील मॅडम यांनी करून दाखवले आणि शिबिराथींनी सुद्धा केले आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील लोणार नाल्यावर जाऊन बंधाराचे जवळपास ५० फुट लांब , ३.५ फूट उंच आणि ४ फूट रुंद वनराई बंधाराचे काम पूर्ण करण्यात आले. हा बंधारा बांधताना गावातील सरपंच सौ. लक्ष्मीताई घुसे , उपसरपंच डॉ. उमेश बोपटे ग्रामपंचायत सदस्यांची त्याचप्रमाणे गावातील मंडळींची सहकार्य लाभले. या वनराई बंधाऱ्याचे आर्थिक मुल्याकंन जवळपास ४०,०००/- ते ५०,०००/- काढण्यात आले आहे. या शिबिराचा बंधारा बांधण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सर्व गावातील गुरांना पिण्याचे पाणी, गावातील लोकांसाठी पिण्याचे पाणी, शेतीला पाणी या हेतूने एक छोटा तलावावर वनराई बंधारा बांधून पाणी अडवण्यात आले आहे आणि या वनराई बंधाराचा लाभ सर्व गावकर्यांना होत आहे.

**विषय : आम्ही व आमचे संविधान**

**वक्ते : प्रा. विनोद देवताळे**

"आम्ही व आमचे संविधान" या विषयावर मार्गदर्शनासाठी श्री रा. ल .तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.विनोद देवताळे (रसायनशास्त्र विभाग) हे आले होते. भारतीय संविधान समजावून सांगताना त्यांनी इतिहासातील घडामोडींचा सविस्तरपणे आढावा घेतला. भारतीय संविधान तयार करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांवरही त्यांनी प्रकाश टाकला. तसेच संविधानातील कायद्यांचे आपण सर्वांनी पालन केलेचं पाहिजे असे प्रतिपादन सुद्धा त्यांनी केले.कार्यक्रमाचे संचलन प्रसाद गुल्हाने तर आभार प्रदर्शन गौरव भटकर या विद्यार्थ्यांनी केले.

**विषय : आधुनिक तंत्रज्ञान वपर्यावरणाचा रास**

**मार्गदर्शक : प्रा. डॉ. आय. ए. राजा**

"आधुनिक तंत्रज्ञान व पर्यावरणाचा ऱ्हास" ह्या विषयावर मार्गदर्शनासाठी श्री.शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.डॉ.आय. ए. राजा आले होते. आजच्या या वाढत्या लोकसंख्येचा पर्यावरणावर होणारा आघात व यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या या बाबींवर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. तसेच वाढत्या रासायनिक खतांचा सजीव सृष्टी वर होणारा परिणाम,जंगलतोड,वाढते तंत्रज्ञान यांच्या दुष्परिणामांची जाणीव त्यांनी शिबिरार्थींना करून दिली.

तंत्रज्ञानाचे जेवढे फायदे आहेत त्यापेक्षा जास्त कदाचित नुकसान आहे याचा उल्लेख त्यांनी केला.या सर्व गोष्टींवर कशा प्रकारे आळा घालता येईल याबाबत त्यांनी शिबिरार्थींना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचलन ओमप्रकाश तांबोडे तर आभार प्रदर्शन कुलदीप राजगुरू या विद्यार्थ्यांनी केले.

**कार्यक्रम : सांस्कृतिक कार्यक्रम**

**सादरकर्ते : सर्व रा.से.यो. स्वयंसेवक,**

**(श्री रा.ल.तो.विज्ञानमहाविद्यालय,अकोला)**

या दिवशी चे शेवटचे सत्र सांस्कृतिक कार्यक्रमांचे होते. या कार्यक्रमात बहुतांशी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिरार्थींनी गीत-गायन, नृत्य आणि नाटिका सादर केल्या.एका पेक्षा एक दर्जेदार कार्यक्रमांनी या संध्येला रंगत आली.सांस्कृतिक कार्यक्रमांना गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलन गोविंद आंधळे या विद्यार्थ्याने केले.

**दिनांक : २३/१२/२०१८**

**वार : रवीवार**

**शिबिर समारोप**

२३ डिसेंबर रोजी दुपारच्या सत्रात रासेयोच्या विशेष शिबिराचा समारोप कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी मा. डॉ. व्ही. डी. नानोटी (प्राचार्य श्री.रा.ल. तो. विज्ञान महाविद्यालय ,अकोला) हे लाभले होते. तसेच मा. श्री. सत्यनारायणजी बाहेती (कार्य. सदस्य दि .बी .जी. इ. सोसायटी, अकोला),मा. डॉ.संजय तिडके (जिल्हा समन्वयक रासेयो अकोला), मा.डॉ सुधीर कोहचाळे (क्षेत्रीय समन्वयक रासेयो, अकोला) मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. समाधान एल. मुंडे व प्रा.डॉ.रश्मी पी.सावलकर तसेच सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश आर.जयस्वाल व प्रा. सोनाली एन.गवांदे हे देखील उपस्थित होते.

विशेष शिबिर ग्राम आपोती (खु.) या आठ दिवसीय शिबिराचा विस्तृत अहवाल कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांनी प्रस्तुत केला. समारोपीय कार्यक्रम हा विशेषतः विद्यार्थ्यांचे मनोगत आणि सत्काराचा असतो म्हणून या ठिकाणी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कु. गायत्री आपोतीकर तसेच गटप्रमुख कु.यशश्री एस. डाबेराव व गटप्रमुख श्री.गोविंद बी.आंधळे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.क्षेत्रीय समन्वयक डॉ.सुधीर कोहचाळे यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी शिबिरा च्या शुभेच्छा दिल्या.कार्य.सदस्य दि. बी.जी.ई.सोसायटी, अकोला श्री. सत्यनारायणजी बाहेती यांनी जीवन घडविण्यात रासेयोचे विशेष योगदान आहे असे सांगितले.मा.प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या श्रमदानाबद्दल त्यांचे कौतुक केले.तसेच आठ दिवसीय शिबिरामुळे विद्यार्थी घडतो, सहजीवन,सहभोजन,लोकसेवेची जाणीव या सर्व गोष्टी शिकतो, असे सांगितले.

गट प्रमुख श्री. गोविंद बी.आंधळे व गट प्रमुख कु. यशश्री एस.डाबेराव यांचा सत्कार मा.डॉ.व्ही.डी.नानोटी व श्री. सत्यनारायणजी बाहेती यांनी शाल,श्रीफळ व रोपटे देऊन केला.तसेच महेश जंजाळ, नरेंद्र जलमकर, कु.नम्रता गायकवाड,कु. निकिता ठाकरे, कु. प्रियंका इंगोले,कु.वैशाली हातोले यांना रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचलन डॉ.रश्मी पी. सावलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.महेश जंजाळ यांनी केले.

**रा. से. यो. सत्र (२०१८-१९)**

**विशेष शिबीर :- ग्राम आपोती (खुर्द)**

**दि. १६/ १२/२०१८ ते २३/ १२/२०१८**

**शिबीर छायाचित्रे**

| | |
|---|---|
|  |  |
| रालतो विज्ञान महाविद्यालयाचे रासेयो विशेष शिबीर, ग्राम अपोती खुर्द यथे उद्घाटन करतांना, दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माननीय डॉ. आर.बी.हेडा,सदस्य श्री अनिलजी तापडिया व प्राचार्य डॉ.व्ही. डी. नानोटी. | शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक क. शि. प्र. संस्था आपातापाचे अध्यक्ष मा. श्री दामोदरजी कडू, तथा दि बी. जी. ई. सोसायटीचे अध्यक्ष मा.डॉ. आर.बी.हेडा, सदस्य श्री अनिलजी तापडिया , प्राचार्य डॉ.व्ही. डी. नानोटी व इतर मान्यवर |
|  |  |
| आपोती गावामध्ये स्वच्छता अभियान राबविताना गावचे सरपंच आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी समवेत रासेयो स्वयंसेवक . | अपोती खुर्द येथे लोणार नाला बंधाऱ्यावर रासेयो स्वयंसेवक समवेत श्रमदान करताना कार्यक्रम अधिकारी. |
|  |  |
| श्रमदान करतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक | लोणार नाला, अपोती खुर्द येथे बंधारा बांधतांना |

| | |
|---|---|
|  |  |
| रासेयो स्वयंसेवक बंधारा बांधतांना | श्रमदाना नंतर संपूर्ण रासेयोची चमू |
|  |  |
| स्वच्छता **रॅली**च्या माध्यमातून गावकर्यांना स्वच्छतेचा संदेश देतांना रासेयो स्वयंसेवक. | आपोती खुर्द येथे महिला मेळाव्यात उपस्थित ग्रामस्थ महिलावर्ग |
|  |  |
| महिला मेळाव्याच्या अध्यक्ष प्राध्यापिका सुजाता ताडम (गणित विभाग प्रमुख), डॉ.अर्चना सावरकर, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी व इतर मान्यवर प्राध्यापिका (श्री रालतो विज्ञान महा. अकोला). | रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी (सावलकर), महिला मेळाव्याचे संचालन करतांना. |




मा.विशाल मोरे आणि मा. गोपाल मुकुंदे (पो.का.दामिनी पथक अकोला पोलीस) आयोजित कार्यक्रम “Cyber Crime & Students”




उन्नत भारत अभियानांतर्गत शेतीपूरक मस्त्यव्यवसाय कार्यशाळाचे संचालन करताना रासेयो क्षेत्रीय समनव्यक डॉ.सुधीर कोहचाळे




“आधुनिक तंत्रज्ञानव पर्यावरणाचा ह्रास” ह्या व्याख्याना दरम्यान मंचावर उपस्थित मा. डॉ.आय.ए. राजा (श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला) व रासेयो कार्यक्रम अधिकारी



"वैज्ञानिक दृष्टीकोन व जादुटोणा विरोधीकायदा" या विषयावर विद्यार्थ्यांना व गावातील लोकांना मार्गदर्शन करताना डॉ.स्वप्ना लांडे मॅडम



"कायदेविषयक मार्गदर्शन" या विषयावर मार्गदर्शन करताना दि बी. जी. ई. संस्थेचे मानद सचिव मा.ॲड.मोतीसिंहजी मोहता व मंचावर उपस्थित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला सचिव व ईतर न्यायाधीश मान्यवर.



२३ डिसेंबर २०१८ रोजी रा.से.यो. विशेष शिबिराचा समारोप प्रसंगी उपस्थित क.शि.प्र.संस्था आपातापा चे अध्यक्ष मा. श्री दामोदरजी कडू, प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी, मा. श्री. सत्यनारायणजी बाहेती, सुधीर कोहचाळे (क्षेत्रीय समन्वयक रासेयो, अकोला) व इतर मान्यवर